# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



प्रेस नोट क्र-२२० दिनांक-०६/०६/२०२४


## कामानिमित्त दुबई येथे गेलेल्या मुलीच्या मालकासोबत वाटाघाटी करुन तिला परत भारतात सुखरुप आणण्यात भरोसा सेलला यश.

भरोसा सेल (गुन्हे शाखा) भाईंदर पश्चिम येथे भाईंदर पश्चिम येथे राहणा-या तक्रारअर्जदार महिला यांनी दि. ०३/०६/२०२४ रोजी केलेल्या तक्रारी अर्जामध्ये त्यांची मुलगी, वय २९ वर्षे ही दिल्ली येथील एजंट नामे तरुण, वय ४० वर्षे याचे मार्फतीने दुबई येथे कामाकरिता दि. ०८/०४/२०२४ रोजी गेली होती. दुबई येथील एका नामांकित हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट चे काम असुन महिना ७०,०००/- रुपये पगार असल्याचे त्याने सांगितले होते परंतु दुबई येथे पोहचल्यावर एजंट तरुण याने तिचा पासपोर्ट व व्हिजा तिच्याकडून काढून घेतला व तिला साधारण ४०-५० महिला राहत असलेल्या एका हॉलमध्ये ठेवले. त्याठिकाणी अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत होते त्यामुळे तिची तब्बेत खालावत चालली होती. त्याबाबत तिने एजंट तरुण यास सांगितले असता त्याने तिचे काहीएक ऐकून न घेता तिला जबरदस्तीने किमान ६ महिने काम करावेच लागेल असे सांगितले. दरम्यान एजंटने तिच्याकडून दोन महिने काम करुन घेतले परंतु पगार दिला नाही. सदरवेळी तिने ती काम करत असलेल्या हॉटेलचे मालक श्री. सलीम यांच्यासोबत बोलणे केले असता त्यांनी पगार हा एजंटला दिला असून त्याचेकडूनच तो मिळेल असे सांगितले. पिडीत मुलगी हिला अस्तमा हा आजार असल्याने दुबईच्या वातावरणात तिची तब्बेत आणखी खराब होत चालली होती. एजंटला तक्रारअर्जदार महिला व पिडीत मुलीच्या भावाने वारंवार फोन करुन विनंती केली परंतु तो काहीएक ऐकून घेण्यास तयार नव्हता.

भरोसा सेल, भाईंदर पश्चिम येथे तक्रारअर्जदार महिलेने तक्रारअर्ज दिल्यानंतर सपोनि तेजश्री शिंदे यांनी लागलीच सदरबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. मदन बल्लाळ यांना संपर्क साधून सर्व हकिकत सांगितली. त्यांनी पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबूरे यांचे मार्फतीने दुबई इंडियन ॲम्बसीला पत्रव्यवहार करण्यास सांगितले. सपोनि तेजश्री शिंदे यांनी तात्काळ तक्रारअर्जदार महिलेस परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाईटवर जावून **<u>"मदद"</u>** या पोर्टलवर मुलीची सविस्तर माहिती भरुन देण्यास सांगितले. दरम्यान अडकलेल्या मुलीस फोनव्दारे संपर्क केला असता तिने सांगितले की, "दुबई मध्ये तिची रहाण्याची जिथे सोय केली आहे तिथे अनेक देशातील मुलींना एकाच हॉलमध्ये दाटीवाटीने राहण्याची सोय केलेली आहे. तिथे अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण त्यांना दिले जाते. जोरजबरदस्तीने त्यांच्याकडून अधिक तास काम करुन घेतले जाते. कोणत्याही प्रकारचा पगार हातात दिला जात नाही. ज्या एजंटने कामासाठी दुबई आणले तो एजंटच पगार घेतो. दोन महिने काम करुन देखिल एजंटने तिला एकही रुपया हातात दिला नाही." असे सांगितले. सदरवेळी पिडीत मुलीने तिच्या हॉटेलचे मालक श्री. सलीम यांचा फोन नंबर दिला. सपोनि तेजश्री शिंदे यांनी मालकास फोनव्दारे संपर्क साधला व वाटाघाटी करुन मुलीची तब्बेत बरी नसून तिला वैदयकिय मदतीची आवश्यकता असल्याने तात्काळ भारतात परत पाठवण्याबाबत प्रयत्न केले असता वाटाघाटी अंती मालक सलीम हे तयार झाले. दि. ०६/०६/२०२४ रोजी परदेशात कामानिमित्त जावून अडकलेली पिडीत मुलगी ही सकाळी दुबई येथून विमानाने सुखरुप भारतात पोहचली आहे.

परदेशात कामाचे चांगले पैसे मिळतील या आमिषाने भारतातून कामानिमित्त अनेक मुलींना परदेशात एजंटच्या मार्फतीने पाठवले जाते परंतु परदेशातील कायदे व प्रक्रिया माहित नसल्याने अनेक कामगार परदेशामध्ये अडकून पडतात. **"मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त"** यांचे वतीने सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, अशा एजंटपासून सावधान रहा व कोणत्याही आमिषाला बळी पडू नका.

वरील कामगिरी अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली भरोसा सेल, भाईंदर कक्षाचे सपोनि/तेजश्री शिंदे, मपोहवा/भारती देशमुख, मपोशि/आफ्रिन जुन्नैदी, मपोशि/पूजा हांडे, पोशि/अक्षय हासे, मसुब/विजय घाडगे यांनी केली आहे.

**----0000----**